**दिनांक.०२/११/२०२०कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या१३ व्याबैठकीचीटिपणी (Agenda)**
**मा. विभागीयआयुक्तांच्याअध्यक्षतेखाली ऑनलाईन बैठक. दुपारी १२:०० वाजता.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय</th><th>करावयाची कार्यवाही</th><th>कार्यवाहीकरणारीयंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>कांदळवन क्षेत्र अधिसूचीत करणेबाबत.</td><td>• भारतीय वन अधिनियम १९२७ कलम ४ अन्वये एकूण १५३११.७ हेक्टर कांदळवनाचे क्षेत्र अधिसूचीत झालेलेआहे. तसेच कलम २० अन्वये १७६३.९५ हेक्टर क्षेत्र अधिसूचीत झालेले आहे. त्यापैकी महसूल विभागाकडून वन विभागाच्या ताब्यात एकूण १३७१६.७३ हेक्टर क्षेत्र दिलेले आहे. सध्या १५९५हेक्टर कांदळवन क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात देण्याबाबत कार्यवाही प्रलंबि आहे.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा</th><th>प्रलंबित क्षेत्र (हे.)</th></tr>
<tr><td></td><td>मुंबई उपनगर</td><td>242.076</td></tr>
<tr><td></td><td>ठाणे</td><td>5.6627</td></tr>
<tr><td></td><td>पालघर</td><td>34.1937</td></tr>
<tr><td></td><td>रायगड</td><td>1194.6274</td></tr>
<tr><td></td><td>रत्नागिरी</td><td>3.07</td></tr>
<tr><td></td><td>सिंधुदुर्ग</td><td>115.3416</td></tr>
</table>
• माहिम नेचर पार्क कडे एकूण 176 हेक्टर संरक्षीत वन कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणे प्रलंबित आहे.<br>
• अतिरिक्त आयुक्त ठाणे महानगरपालिका यांचे दि. १७.०९.२०२० रोजीच्या पत्रानुसार ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये सार्वजनिक जागेवर कांदळवन क्षेत्र नाही असे नमूद केले आहे.</td><td>सर्व जिल्हाधिकारी</td></tr>
<tr><td>२</td><td>नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतीबाबत.</td><td>• समितीच्या अध्यक्षांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकारी किंवा निवासी जिल्हाधिकारी यांना समितीसाठी नोडल अधिकारी यांना नियुक्त करण्यास व नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याचे नाव, पदनाम,</td><td>सर्व जिल्हाधिकारी,<br>सर्व महानगरपालिका,<br>सिडको</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | मोबईल, ईमेल याबाबतची माहिती सदस्य सचिवांना पत्राद्वारे कळविण्याचे निर्देश दिले आहेत.<br>• नोडल अधिकारी पालघर, डॉ. किरण महाजन, निवासी उप जिल्हाधिकारी, पालघर ,<br>• 9822434196, रत्नागिरी- श्री. दत्ता भडकवार, निवासी उप जिल्हाधिकारी, रत्नागिरी 9967436012 उर्वरित नोडल अधिकाऱ्यांची माहिती प्रलंबित आहे. | |
| ३ | **जिल्हा स्तरीय समितीच्या दरमहा बैठका घेणेबाबत.** | • समितीच्या अध्यक्षांनी **सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दरमहा पहिल्या आठवडयात कांदळवन तक्रांरीबाबत प्राधान्याने बैठक घेण्याच्या सूचना दिल्या** व त्या नंतर दुसऱ्या आठवडयात राज्य समितीच्या बैठकीमध्ये केलेल्या कार्यावाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले.<br>• जिल्हाधिकारी, मुंबई शहर व जिल्हाधिकारी ठाणे यांच्यामार्फत जिल्हा स्तरीय बैठक घेण्यात आली आहे असे निदर्शनास आले. | **सर्व जिल्हाधिकारी** |
| ४ | **पोलीस यंत्रणेस दिलेल्या सूचना** | • कांदळवन सतिमीमधील तक्रारींच्या अनुषंगाने पोलीस यंत्रणेद्वारे आता पर्यंत कांदळवन ऱ्हासाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारींवर केलेल्या कार्यवाही बाबत तक्रार निहाय अनुपालन अहवाल समितीपुढे ७ दिवसात सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या. उदा. चार्चशीट, FIR व संबंधीत कागदपत्रांसहीत. | **संबंधीत पोलीस अधिकारी**<br>**अहवाल प्रलंबीत** |

## २.मागील बैठकीतील तक्रारी.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>तक्रारदार व तक्रारीचा विषय</th><th>करावयाची कार्यवाही</th><th>कार्यवाहीकरणारीयंत्रणा</th></tr>
<tr><td>१</td><td>कांदळवन क्षेत्रातील डेब्रिस काढून टाकणे.</td><td>

• सदरचा विषय हा गेली सहा महिन्यापासून प्रलंबित असल्यामुळे समितीने या विषयावर गार्भीर्याने लक्ष देऊन १४ हेक्टर जागेपैकी खालीलप्रमाणे १०.२२ हेक्टर जागेवरील डेब्रिज हटवून कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>गावाचे नाव</th><th>अतिक्रमण तोडलेल्या झोपडी संख्या</th><th>क्षेत्र हे.</th><th>सर्वे नं.</th></tr>
<tr><td>१</td><td>मौजे विक्रोळी</td><td>२६२</td><td>०.३९३</td><td>२०९</td></tr>
<tr><td>२</td><td>मौजे घाटकोपर (छेडानगर/चेंबुर)</td><td>७२८</td><td>०.८९७६</td><td>२३६</td></tr>
<tr><td>३</td><td>मौजे माहिम</td><td>१०५</td><td>०.५</td><td>१०५/ ३४७</td></tr>
<tr><td>४</td><td>मौजे चित्ता कॅम्प</td><td>४५०</td><td>२.०</td><td>१५२</td></tr>
<tr><td>५</td><td>मौजे तुर्भे</td><td>२९०</td><td>०.४३५</td><td>१५२/ १० पैकी</td></tr>
<tr><td>६</td><td>मौज मालवणी</td><td>१९६</td><td>४.००</td><td>२६३</td></tr>
<tr><td>७</td><td>मौजे मार्वे</td><td>६३</td><td>०.५</td><td>२६३</td></tr>
<tr><td>८</td><td>मौजे कांदिवली</td><td>१८०</td><td>१.५</td><td>१४९</td></tr>
</table>

त्या अनुषंगाने विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांच्या दि. २९.०८.२०१९ रोजी उपआयुक्त, घनकरचा व्यवस्थापन, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना दिलेल्या पत्रानुसार कार्यवाही करण्यास समितीमार्फत आदेश देण्याबाबत शिफारस करण्यात यावी.</td><td>मुंबई महानगरपालिका<br><br>महसुल<br><br>वन<br><br>म्हाडा</td></tr>
</table>

## मुंबई उपनगर जिल्हयातील तक्रारी

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाहीकरणारीयंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | **तक्रार क्र. ८**<br><br>श्री. बी.एस. यादव- दि.२६.११.२०१८ | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबइ उपनगर यांच्या दि.२९.०८.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी कांदळवनालगत अदानी ईलेक्ट्रीसिटी सप्लायचे पाईपलाईन साठी खोदकाम करत असल्याचे निदर्शनास आले. सदरचे खोदकाम हे कांदळवनालगत असल्याने पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | KMC-2 Mangrove Destruction<br><br>Illegal construction of common toilets in malad, puming state and tata power station in Malvani, Malad. | अन्वये टाटा पॉवर स्टेशनचे संबंधीत अधिकारी व अदानी ईलेक्ट्रीसीटी सप्लाय कंपनीचे सुपरवायझर श्री. सतीश माळी यांचे विरुध्द गुन्हा क्र. ३३७/२०१९ दि. २५.०६.२०१९ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. | **(अहवाल प्राप्त)** |
| २ | **तक्रार क्र. १२**<br><br>श्री. लुक मेंन्डीस दि.३०.११.२०१८<br><br>Mangroves under threat at Bandra east below Mahim-Sion link way. | • जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या दि.२२.०४.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर जागा ही माहिम धारावी पूल लगत असून त्या ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून येत नाही परंतु कांदळवना लगत मोठया प्रमाणात डेब्रीज टाकलेले असून ते पुढे सरकूल कांदळवनास नुकसान होण्याची शक्यता आहे.<br>• सदर जागेवरील डेब्रिज हटविण्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही असे समितीच्या निदर्शनास आले.<br>• सदर जागेवरील डेब्रिज १५ दिवसात हटवून सदर जागेवर कांदळवनाची लागवड करण्याच्या सूचना दिल्या होत्या. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल प्राप्त)**<br>२. बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३ | **तक्रार क्र. १८**<br><br>उत्कर्ष सार्वजनिक मित्र मंडळ वेबसाईटद्वारा प्राप्त तक्रार KMC-3 दि.०३.१२.२०१८<br><br>Mangroves Cutting in Gorai Sector 2 | • या तक्रारी संदर्भात SDO मुंबई उपनगर यांनी सदर ठिकाणी कांदळवन आहेत यापूर्वी सदर ठिकाणी डेब्रिज टाकल्यामुळे अज्ञात व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने कांदळवनाच्या संरक्षण करण्याच्या दृष्टीने सदर ठिकाणी भराव होऊ नये यासाठी CCTV कॅमेरा बसविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश समितीने दिले आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>२. मुंबई महानगरपालिका<br><br>**अहवाल अप्राप्त** |
| ४ | **तक्रार क्र. २४**<br><br>श्री. दिपक कामथ - दि.०९.१२.२०१८<br><br>Potential illegal work near mangroves within Chheda Nagar area. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.२२.०२.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदरचे Geo Coordinates हे गुगल अर्थ वर तपासले असता तसेच वन विभागाचाचे प्रतिनिधी यांचेकडे असलेल्या अधिसूचीत कांदळवन नकाशाचे अवलोकन केले असता सदरचा भराव हा कांदळवन क्षेत्राच्या बाहेर असल्याचे दिसून आले.<br>• तसेच सदर ठिकाणी आजूबाजूला कोठेही कांदळवनाची झाडे दिसून आले आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणच्या पुढे २०० ते ३०० मी. अंतरावर रस्त्यालगत रोड नं. ३ | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर,<br><br>**(अहवाल प्राप्त)**मुंबई महानगरपालिका आणि वन विभाग |
| ५ | **तक्रार क्र. ६८** श्री. नंदकुमार पवार. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | दि.१४.०४.२०१९<br><br>New illigal slum development at chheda Nagar reserved forest land near Jijamata Bhosle Marg junction. Chembur. | येथे माती, दगडाचा ढिग दिसून आला असून सदरचा भराव अधिसूचीत कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याचे दिसून आला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरचा भराव हटविण्याची कार्यवाही महानगरपालिका यांना दिल्या असून कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | **(अहवाल अप्राप्त)** |
| ६ | **तक्रार क्र. २७**<br><br>श्री. डेबी गोएंका - दि.१२.१२.२०१८<br><br>Destruction of mangroves by INS Hamla at Marve. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी Contractor विरुध्द FIR दाखल करण्यात आली आहे असे सांगितले.<br>• समितीमार्फत नेवीच्या अधिकाऱ्यांना वन संवर्धन अधिनियम (FCA) प्रस्ताव मागविण्यात आला होता परंतु अद्याप प्राप्त झालेला नाही.<br>• समितीने या तक्रारीबाबत समितीने अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या बैठकीत सदरचा विषयाबाबत चर्चा झाल्यानुसार त्यांच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ७ | **तक्रार क्र. २९**<br><br>श्री. सुनिल अगरवाल – दि.१५.१२.२०१८<br><br>Destruction of Mangroves by Janakidevi Public School in Andheri (west) | • या तक्रारीबाबत अपर चिटणीस, मुंबई उपनगर यांच्या अहवालानुसारमौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील स.नं. १२०अ या महाराष्ट्र हौसिंग बोर्डाचे मिळकतीवर अभिन्यासातील जानकीदेवी पब्लिक स्कुलच्या कुंपण भिंतीला लागून खाडीकडील बाजूस अंदाजे ५५x३०० फुट जागेवर जानकीदेवी पब्लिक स्कुलमार्फत पेव्हर ब्लॉक बसवले असून सदर जागेवर जानकीदेवी पब्लिक स्कुलच्या स्कूलबस, कार पार्किंग केल्याचे दिसून येते. सदर जागेला खाडीकडील बाजूने तारेचे कुंपण केलेले असून तारेचे कुंपण कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याचे दिसून येत आहे. स्थळपाहणीवेळी सदर ठिकाणी कांदळवनाची तोड झालेली नाही.<br>• सदर मिळकतीवरील कांदळवनाचा ऱ्हास केल्याबाबत यापूर्वी वर्सोवा पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. ३९/१६ अन्वये श्री. नरेंद्र वर्मा यांचे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच सदर मिळकतीवर कांदळवनाची पुर्न: लागवड करणेबाबत तहसिलदार अंधेरी यांचेकडील दि.०३/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये वनक्षेत्रपाल अधिकारी, कांदळवन कक्ष यांना कळविण्यात आलेले आहे. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br><br>**(अहवाल प्राप्त)**<br>२. मुंबई महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | **तक्रार क्र. ४९**<br>श्री. रेजी अब्राहम दि. 16.1.2019<br>Mangroves destruction –Illegal chawl construction in Charkop चारकोप, कांदिवली (पश्चिम) | • या तक्रारी संदर्भात उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांच्या दि.१९.०९.२०१९ रोजीच्या अहवालानुसार लक्ष्मीनगर ते डिंगेश्वर मंदिर याअर्धवर्तुळाकार भागात कांदळवनापसून ५० मीटरच्या आत अनेक अनधिकृत बांधकामे, झोपडया दिसून आले आहेत.<br>• त्याप्रमाणे जलाराम मंदिर येथील भागात सुध्दा कांदळवनापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अनधिकृत बांधकामे, झोपडया, दुकानांचे गाळे दिसून आले आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणी रस्त्याच्या पूर्व बाजूस इमारती आहेत. सदर जागेवर कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नाही. सदर जागेच्या दक्षिणेस नाला गेलेला असून सदर नाल्यालगत डेब्रिज टाकण्यात आलेला आहे.<br>• सदर जागेची द्रोण द्वारे छायाचित्रांची तुलना केली असता सन २००५ मधील कांदळवन क्षेत्र आज रोजी कमी झालेले दिसून येत नाही. तसेच भविष्यात सदर ठिकाणी कांदळवनाचे काही नुकसान होणार नाही व कांदळवनापासून ५० मीटर बफर क्षेत्रात अनधिकृत बांधकाम होणार नाही यांची दक्षता घेण्यास समितीने सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदरची **तक्रार बंद करण्यास शिफारस** करण्यात येत आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| ९ | **तक्रार क्र. ५० श्री. रेजी अब्राहम** - दि.16.1.2019<br>Mangroves destruction चारकोप, (पश्चिम) | | |
| १० | **तक्रार क्र. ५१ श्री.** रेजी अब्राहम - दि.19.1.2019<br>Mangroves destruction – Tipusultan Ground CTSno. 2841मालवणी, मालाड(पश्चिम) | | |
| ११ | **तक्रार क्र. ५३** श्री. रेजी अब्राहम दि.31.01.2019<br>Dheeraj Bhandari regular land Mafia of charkop village, nonchalantly continues building his huge illegal ground floor plus one above room each room of 200 sq feet behind Jalaram temple in charkop village in violation | | |
| १२ | **तक्रार क्र. ५४**श्री.रेजी अब्राहम दि.02.02.2019<br>No necessary visit much less action so far by BMC R SOUTH WARD, collector western suburbs, mangroves cell, deputy collector encroachment nor charkop police station with regard to ongoing illegal chawl construction in CRZ restricted mumbai high court. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | **तक्रार क्र. ६९**<br><br>श्रीम. आदिती प्रधान दि.२०.०४.२०१९<br><br>Debris dumping in Lokhandwala Mangrove in Andheri West | • या तक्रारी संदर्भात मौजे वर्सोवा येथील स.क्र. १२० अ, ही मिळकत महाराष्ट्र हौसिंग बोर्ड यांच्या मालकीची आहे. सदर ठिकाण टाकण्यात आलेले डेब्रीज हे कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटरच्या आत करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन, पर्यावरण विभाग यांच्या कडील शासन निर्णय क्रमांक ईएनव्ही-२००१/१८३/प्र.क्र.३१/ता.क.१ दि. २५/०१/२००१ नुसार “कांदळवनाचे (खार फुटी) क्षेत्र अर्थात जमीन ज्या विभागाच्या अखत्यारित आहे, त्या विभागाने त्या क्षेत्रात कांदळवनाची अवैध कटाई/नुकसान झाल्यास संबंधित विभागाने प्रचलित नियमाप्रमाणे कारवाई करणे ही त्या विभागाची जबाबदारी राहील.” असे नमुद आहे. त्यामुळे आपल्या मालकीच्या जमिनीमध्ये कांदळवनाच्या क्षेत्रापासून ५० मीटर क्षेत्राच्या आत अवैध डेब्रीज टाकणाऱ्या विरुध्द पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच सदर क्षेत्रातील कांदळवनाचा ऱ्हास कोणाकडूनही केला जाणार नाही. याची दक्षता घेण्याची देखील आवश्यकता असल्याने या संदर्भात मा. मुख्य अधिकारी मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना आपले स्तरावरुन लिहून जाणेस विनंती आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, पश्चिम उपनगर यांनी दि ३०/१२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला आहे.<br>• सदर प्रकरणी यापुर्वीच या कार्यालयाकडील दि. १९/११/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई यांना सदर ठिकाणच्या अतिक्रमण आणि कांदळवन ऱ्हासाबाबत कळविलेले आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल प्राप्त)** |
| १४ | **तक्रार क्र. ८७ श्री. स्टॅलिन डी. दि.२१.०७.२०१९**<br><br>Wall being constructed next to the mangroves. | • या तक्रारी संदर्भात दि. १२.०२.२०२० रोजीच्या प्राप्त अहवानानुसार सदर जागेवर भिंत बांधकाम चालू होते. याबाबत वनपाल यांना विचारणा केली असता, सदर भिंतीचे बांधकाम वन विभागामार्फत चालू होते. प्रकरणी तक्रारदार यांचा जबाब नोंदविला असून त्यामध्ये त्यांनी तक्रार आता मागे घेतली आहे. त्यांचे म्हणणेनुसार सदर भिंतीमूळे तिवरांच्या झाडांचे नुकसान होऊ नये व यापूढे सदर झाडांचे संरक्षण करावे, असे जबाबबात नमूद केले आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर प्रकरणी कोठेही कांदळवनाचा ऱ्हास झालेला नसल्यामुळे सदरची तक्रार बंद करण्यास शिफारस करण्यात येत आहे. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | **तक्रार क्र. ९१** श्रीमती.श्वेता भट,दि. १३.०८.२०१९<br><br>Destruction of Mangroves at Mankhurd, Mumbai, by Yogayatan Ports Pvt. Ltd. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि. ११.०२.२०२० रोजीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये नमूद जागा मौजे तुर्भे ता. कुर्ला येथील न. भू.क्र. ५०८ मधील २३२९९ चौ.की. जमीनीपैकी कांदळवन विरहीत वितरणासाठी उपलब्ध असलेली जमीन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना जहाज दुरुस्ती करीता शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील ज्ञापन क्र.जमीन-2604/1294/प्र.क्र.2023/ज-3 दि.28.08.2007 व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे दि. ०४.०२.२००८ रोजीचे आदेशान्वये ३० वर्षाच्या भाडे पट्टीने प्रदान करण्यात आलेले आहे.<br>• सदर जागेवर जेट्टीचे बांधकामामुळे कोणत्याही प्रकारच्या कांदळवनाच्या झाडाचा ऱ्हास झालेला नाही तसेच सदर ठिकाणी आवश्यक त्या संबंधीत विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्यात आलेल्या आहेत, असे योगायेतन पोर्टचे प्रतिनीधी श्री. राहूल महादेव सोमकुंवर यांनी त्यांचे जाबाबात नमूद केले आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| १६ | **तक्रार क्र. ९४** दि.०१.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहम<br><br>Site visit by SDO and other enforcement authorities at malad malwani, lagoon road, CTS no 2841, S.no 263 on 21.07.2019 following our complaint and consequent directions by high court monitored state mangroves monitoring committee. | • या तक्रारी संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी पश्चिम मुंबई यांच्या अहवालानुसार मालवणी सर्वे नं. २६३ पै.न. भु.क्र. २८४१ अ च्या उत्तरेस मालाड मार्वे रोड आहे. रोडच्या बाजूने दक्षिण दिशेस लगून रोड आहे. सदर रोडच्या पूर्वेस काही अतिक्रमीत दुकाने व झोपडया आहेत. सदर ठिकाणच्या मागील बाजूस हिंदु, ख्रिश्चन धर्मीयांची स्मशानभूमी आहे. दुकानाच्या दक्षिणेस एस.आर.के. ने बांधलेल्या मानवस्थळ को.हा. सो. इमारती आहे. सदर इमारतीच्या पूर्वेस कांदळवन दिसून येत आहे. तसेच टिपु सुलतान मैदानाच्या दक्षिण बाजूस टाटा पावर कंपनीची जागा असून सदर जागेत दगड सिमेंटचे बांधकाम सुरु असल्याचे दिसून आले व पश्चिमेस कुंपण भिंत आहे.<br>• सदर जागेच्या जी.पी.एस रिडींग गुगल अर्थ वर सुपर इंपोज केले असता सदरचे क्षेत्र हे अधिसूचीत राखीव कांदळवन नसल्याचे दिसून येत आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल प्राप्त)** |
| १७ | **तक्रार क्र. ९५** दि.१२.०९.२०१९ श्री. रेजी अब्राहमRequest strong action against concerned officials (Revenue, BMC (P north SWM department), malwani police station | • समितीने या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल १५ दिवसात समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | and mangroves cell) for overlooking timely action in spite of first complaint on 01.02.2018(mcc2017-43) and last complaint on 09.09.2019. | | |
| १८ | **तक्रार क्र. ९८ श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार दि.०६.०८.२०१९**<br><br>Debris mafia shifts goalposts on Sion Panvel Highway – Chembur. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या प्रतिनिधींनी सदरची जागा ही सॉल्ट विभागाची असून सॉल्ट आयुक्तांना कांदळवन ऱ्हासाबाबत कळविले असल्याचे सांगितले.<br>• परंतु समितीने सदरची जागा सॉल्ट विभागाची असली तरी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्यामार्फत सदर जागेची स्थळ पाहणी करुन डेब्रिज हटविण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| १९ | **तक्रार क्र. १०३** श्री. शैलेश राव दि. 15.11.2019<br><br>Landfilling of mangroves and also illegal destruction in Madh, Malad(w) Mumbai 400061 | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.०६.०३ २०२० रोजीच्या अहवालानुसार सदर स्थळ पाहणीच्या वेळी तक्रारदार श्री. शैलेश राव उपस्थित राहीले नाहीत. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात सर्वे नंबर व न.भू.क्र तसेच जागेचा पूर्ण पत्ता याबाबत कोणत्याही गोष्टीचा उल्लेख केलेला नसल्याने संबंधीत जागेचा बोध झाला नाही. | १. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल प्राप्त)** |
| २० | **तक्रार क्र. १०६** श्रीमती सुप्रीया रेघे दि. 05.12.2019<br><br>Garbage and debris in mangroves, Kandivali (W) Charkop, Mumbai. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि.०६.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर जागा मौजे चारकोप ता. बोरीवली येथील सर्वे क्र. ४१ पै. व मौजे कांदिवली सर्वे क्र. १४९ पै. येथील असून या जमीनीवर कांदळवनास लागून असलेल्या रस्त्यावरुन कोणी अज्ञात व्यक्ती घरातील टाकाऊ फर्निचर, थर्माकॉल, घरातील दुरुस्तीचे काम करतेवेळी असलेले टाकाऊ लादया इत्यादी रस्त्यालगत असलेल्या कांदळवनात टाकल्याचे दिसून आले. तसेच तक्रारदार यांनी बृहन्मुंबइ महानगरपालिका यांचे सफाई कर्मचारी यांचे मार्फत साफसफाई करुन घेत असल्याचे दिूसन आले.<br>• सदर प्रकरणी विषयांकीत मिळकतीवरील कांदळवनाचा ऱ्हास केले प्रकरणी मंडळ अधिकारी बोरीवल यांनी यापूर्वीच अज्ञात इसमावर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ (१ (२) अन्व्ये चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. १०/२०१९ दि. १४.०१.२०१९ रोजी दाखल केलेला आहे. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | **तक्रार क्र. १११** दि.23.12.2019<br><br>श्री. सुकांत कॉल<br><br>Mangrove Destruction<br><br>जनकल्याण नगर, मालाड (पश्चिम) मुंबई. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २२ | **तक्रार क्र. ११२** श्री. संय्यद अब्बास रिझवी **दि.** 25.12.2019 - Complaint against blatant destruction of Mangroves by dumping debris and for carryingout unauthorized and illegal construction of RCC building on mangroves land in CRZ 1 department of P/North Ward, Malad West, Mumbai. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २३ | **तक्रार क्र. ११८ श्री. हरीश पांडे दि.25.01.2020** large scale CRZ 1 reclamation & mangroves destruction in Ganpat Patil Nagar in Dahisar, Mumbai | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २४ | **तक्रार क्र. ११९ श्री. हरीश पांडे दि.25.01.2020**<br><br>Reclamation of wetlands at Dharma Nagar, Borivali West. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर.<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| २५ | **तक्रार क्र. १२० श्री. हरीश पांडे दि.25.01.2020** | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | Mass scale reclamation of Wetlands & Mangroves next to Eskay Club, Borival | | **(अहवाल अप्राप्त)** |
| २६ | **तक्रार क्र. १२१** श्री. रेजी अब्राहम दि.24.01.2020<br><br>Illegal constructions in charkop village by chawl mafia Bipin Bhandari and Chaurasiya on collector land... | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| २७ | **तक्रार क्र. १२२** श्री. रेजी अब्राहम दि.4.03.2020<br><br>Large scale Illegal construction activities continue unabated on huge tracts of land under ND zone affected by CRZ laws at acres of collector land/forest land at CTS no.1650 and adjacent huge layout of village erangal, opposite retreat hotel, bhask... | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| २८ | **तक्रार क्र. १३१** श्री. स्टॅलिन डी दि.२६.०६.२०२०<br><br>Encroachments coming up in CRZ mangrove areas during lockdown.<br><br>shanties that have come up in S. No १६१ Juhu Versova Link Rd adjoining the beach ahead of Rajiv Gandhi institute Andheri West. | • या तक्रारी संदर्भात वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई यांच्या दि.१७.०७.२०२० रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी अधिसूचीत राखीव कांदळवन क्षेत्रात नव्याने झोपडया झालेल्या नाहीत. सादर ठिकाणी स्थानिक कोळी लोकांनी पावसाळा असल्याने त्यांच्या बोटी तिथे प्लॅस्टिक आवरणाने व बांबू लावॅन तेथे राखून ठेवलेले आहेत.<br>• सदर ठिकाणी नव्याने कांदळवनाची तोड किंवा नुकसान झालेले नाही.<br>• या जागेचे जी.पी.एस. रिडींग हे गुगल अर्थ वर MRSAC नुसार सरचे क्षेत्र हे अधिसूचीत राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br><br>**(अहवाल अप्राप्त)**<br><br>वनपरिक्षेत्र अधिकारी, पश्चिम मुंबई<br><br>**(अहवाल प्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ | **तक्रार क्र. १३२** श्री. स्टॅलिन डी दि.१७.०८.२०२०<br><br>वर्सोवा सर्व्हे नं १६१ मॅग्रोव्ह एरिया रिलायन्स फेड्रेशन क्लब येथील तक्रारीबाबत. | • समितीने या तक्रारींबाबत जिल्हा स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये या तक्रारींबाबत योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे निर्देश दिले. | |

**ठाणे जिल्हयातील तक्रारी**

| अ. क्र. | तक्रारदार व तक्रारीचा विषय | करावयाची कार्यवाही | कार्यवाहीकरणारीयंत्रणा |
|---|---|---|---|
| ३० | **तक्रार क्र. ९**<br><br>श्री. जयेश गुप्ता – दि.२४.११.२०१८<br><br>Destroying mangroves in the CRZ Creek ara of Sabe- Desai-Khardi Gaon, Thane. | • या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेने दिवा खर्डी डंपिंग ग्राऊंड यांचे शास्त्रीय दृष्टया Closure करण्यासाठी (National Environmental Engineering Research Instituted) यांना सल्लागार म्हणून नेमले आहे व त्या अनुषंगाने पहिल्या टप्प्यामध्ये एकूण ५ हेक्टर जागेसाठी Biocapping पध्दतीने Scientific Closure करण्यासाठी संबंधित संस्थेने अहवाल सादर केलेला असून त्यानुसार ठामपातर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल असा अहवाल दिला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर जागेवरील उर्वरित कार्यवाही पूर्ण करुन त्या बाबतचा अहवाल सादर करण्याच्यास सूचना ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना दिल्या. | आयुक्त ठाणे महानगरपालिका<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३१ | **तक्रार क्र. १७** श्री. धिरज परब, दि.०५.१२.२०१८<br><br>सेव्हन इलेव्हन हॉटेल कं. ने मीरा रोड कनकिया येथे कांदळवनाची तोड करुन माती भराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | • या तक्रारीबाबत आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि. २०.०३.२०२० रोजीच्या अहवालानुसार मौजे नवघर सर्वे क्र. ५०, ५१,५८,६९ ही जागा सेव्हन इलेव्हन हॉटेल कंपनीच्या मालकीची आहे.<br>• तसेच सर्वे क्र. ५० येथे पत्र्याचे संरक्षण भिंत आढळून आली आहे.<br>• सर्वे क्र. ५१ येथे सपाटीकरण करुन काही ठिकाणी गार्डन तयार करण्यात आलेले आहे.<br>• तसेच सर्वे क्र. ५९येथे सपाटीकरण करण्यात आलेले आहे.<br>• सर्वे क्र. ६९ येथे सिमेंट कॉक्रीटचा छोटा रस्ता तयार करण्यात आला आहे.<br>• सेव्हन इलेवन हॉटेल प्रा. लि. चे श्री. विनोद मेहेता यांच्या विरुध्द सदर ठिकाणी कांदळवनाचे नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा क्र. १११२/२०१० दाखल करण्यात | जिल्हाधिकारी, ठाणे<br><br>**(अहवाल अप्राप्त)** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आला आहे. तसेच सर्वे क्र. ६९हि क्र. १,२या ठिकाणी काही भागात सपाटीकरणाचे काम चालू असल्याचे व सदरचे काम कांदळवनालगत सी.आर.झेड लगत होत असल्याचे निदर्शनास आले म्हणून श्री. प्रशांत केळुसकर, विनोद मेहेता व इतर जमीन मालक यांच्या विरुध्द गुन्हा क्र. ०१८९ अन्वये गुन्हा दाखल झाल्याचे दिसून येत आहे.<br>• सदर विकास कामाबाबत महानगरपालिकेमार्फत गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. | |
| ३२ | **तक्रार क्र. २१**<br>श्री. बी.एन. कुमार व श्री. नंदकुमार पवार<br>दि.०९.१२.२०१८<br>Sion Panvel Highway work damaging Mangroves. | • तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार Highway जवळ कांदळवनाचे नुकसान झालेले नाही परंतु सदर जागेवर कांदळवनालगत डेब्रिज टाकण्यात आलेले आहे.<br>• सदरचे कांदळवन हे सायन पनवेल रोडपासून १० ते १५ मी. अंतरावर असून पनवेल रोडच्या रुंदीकरणाच्या कामामुळे आजरोजी कोठेही नुसान झाल्याचे दिसून येत नाही.<br>• तसेच सदरची कार्यवाही पुर्ण करण्यासाठी कार्यकारी अभियंता, PWD यांना बैठकीत उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आहे परंतु सदरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | जिल्हाधिकारी, ठाणे<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३३ | **तक्रार क्र. ८३** श्री.बी.एन. कुमार ०१.०८.२०१८<br>Mangrove killing along Sion-Panvel highway - Request for rapid action force. | | |
| ३४ | **तक्रार क्र. ६५**<br>श्री. सुबीर वर्मा - दि.२७.०३.२०१९<br>Dumping to claim mangrove Land, Thane. | • तहसिलदार ठाणे यांच्या दि. ०५.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार मंडळ अधिकारी बाळकुम यांनी अर्जदार यांचे समवेत दि. २९.६.२०१९ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाउुन पाहणी केली असता सदर जमिनीवर मोठया प्रमाणात डेब्रिजचा भरणा केलेला असून जमीन भरणी करत पुढे पुढे वाढवत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. मीरा-भाईंदर महानगरपालिका, जि. ठाणे.<br>**(अहवाल अप्राप्त)** |
| ३५ | **तक्रार क्र. ७६**<br>श्री. धिरजपरब:-भाईंदरपश्चिमराधास्वामीसत्संगवपरिसरातपाणथळ, कांदळवनाच्याऱ्हासाबाबत.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • या तक्रारी संदर्भात आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या अहवालानुसार सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता तक्रारीतील नमूद खाजगी व सरकारी जागेवरील माती भराव जुने दिसून येत असून नव्याने भराव / डेब्रिज टाकल्याचे आढळून आलेले नाही.<br>• सध्यस्थितीत सदर जागेवर जंगली झाडे व गवत असल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु तेथे कांदळवन व पाणथळाचा ऱ्हास झाल्याचे आढळून येत नाही. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका,<br>जि. ठाणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • परंतु अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी डेब्रिज मातीच्या विटा तसेच इमारत बांधकामाचे रॅबीट व इत्यादीच्या सहाय्याने ठिकठिकाणी भराव करण्यात आलेलाअसून सदर जमीन मिळकत ही अंशत: राधा स्वामती सत्संग व्यास अंशत: शामसुंदर अग्रवाल यांच्या मालकीची असून सदर जमीनीचे नवीन सर्वे नं. २१० व सर्वे नं. २११ असे आहेत. पंरतु सदर ठिकाणी सिमा चिन्ह निश्चित नसल्याने स.नं. हद्द समजून येत नाही व सदर ठिकाणी नव्याने करण्यात आलेल्या भरावाचे मोजमाप हे सुमारे २०० ब्रास इतके असून सदरचा परिसर हा कांदळवन क्षेत्रालगतचा असल्याने प्रस्तुत डेब्रीजच्या भरावामुळे कांदळवनाचे नुकसान झाले असल्याचे नाकारता येत नाही असे तक्रारदार यांनी भेटी दरम्यान नमुद केले आहे. तरी सदर ठिकाणी कांदळवन नुकसान झालेले दिसुन येते.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर ठिकाणी संबंधीतांवर FIR दाखल करुन मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत तेथील डेब्रिज व माती भराव काढण्याचे निर्देश देऊन अहलवा समितीपुढे सादर करण्यास सांगितले. | **अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त** |
| ३६ | **तक्रार क्र. ७७**<br>श्री. धिरजपरब:- मीराभाईंदरमहापालिकाहद्दीतीलमीरारोडपश्चिमयेथेनाझरेथआगरपरिसरातसरकारीवखाजगीजागेतकांदळवनपाणथळचाऱ्हास करून CRZचेउल्लंघन.<br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार. | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी मिरा- भाईंदर महानगरपालिका यांनी ३ ते ४ वर्षापूर्वी माती व डेब्रिज भराव करुन रस्त्यालगत झाडांची लागवड केलेली आहे. सदर ठिकाणी ५० वर्षापासून पत्र्याचे घर बांधलेले आहे. या ठिकाणी नवीन बांधकामे झालेली नसून आज रोजी कांदळवनाचे नुकसान झालेले दिसून येत नाही. तसेच जमीन CRZ बाधित आहेत अगर कसे याबाबत वन विभागाचे अभिप्राय आवश्यक आहेत.<br>• त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी असलेला असलेला भराव हटविण्याच्या व सदर ठिकाणी पुन्हा भराव होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले. | १. जिल्हाधिकारी, ठाणे.<br>२. आयुक्त, मीरा-भाईंदर महानगरपालिका,<br>जि. ठाणे.<br>**अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त** |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | **तक्रार क्र. ७९**<br><br>श्री. धिरज परब: -मीराभाईंदरमहापालिकाहद्दीतीलनवघरगावमागीलसरकारीखाजणसर्वेक्र. १५मध्येमनपानेपाणथळ, कांदळवनवसीआरझेड१मध्येबेकायदाटाकलेलाकचरा, भरावकाढूनकांदळवनाचीलागवड.<br><br>पाणथळ समितीकडून कांदळवन समितीकडे वर्ग केलेली तक्रार | • या तक्रारी संदर्भात अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांच्या अहवालानुसार मौजे नवघर स.नं. १५ मधील अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले तक्रारीचे ठिकाण हे शंकर नारायण महाविद्यालयाचे क्रिडांगणाच्या उजव्या बाजूस असलेल्या जागे संबंधीत असून प्रत्यक्ष स्थळ पाहणी दरम्यान अर्जदार यांच्या तक्रारी अर्जात नमूद केल्याप्रमाणे चौकशी केली असता अर्जदार यांच्या अर्जानुसार सदर ठिकाणी कांदळवना लगत उभारण्यात आलेले श्री रामा रामनाथ यादव यांचे तबेल्याचे अंदाजे 40 x 40 फुट तात्पुरती शेड व त्यालगत असलेल्या चाळीचे बांधकाम दिसून आले. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेचे शौचालयाचे बांधकाम करण्यात आलेले आहे तसेच आज रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी दरम्यान कांदळवनाची कत्तल अथवा ऱ्हास होत असल्याबाबत आढळून आलेले नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत सदर ठिकाणी बांधलेले अनधिकृत शौचालय तोडण्याबबत कार्यावाही करण्याच्या सूचना दिल्या. | तहसिलदार ठाणे<br><br>(जिल्हाधिकारी ठाणे)<br><br>**अपर तहसिलदार मिरा-भाईंदर यांचा अहवाल प्राप्त** |
